# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## विद्यार्थी विकास विभाग

दूरध्वनी : २६६८०४७,८६००२८५८५७ Website:www.sgbau.ac.in/Student Development/Letter Email:directorsd@sgbau.ac.in

क्र.संगाबाअवि/१३/विवि/१८९/२०२२
दिनांक : १३.१२.२०२२

प्रति,
मा.प्राचार्य/विभाग प्रमुख,
सर्व संलग्नित महाविद्यालये/पदव्युत्तर शैक्षणिक विभाग/
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,
अमरावती.

**विषय : संत गाडगे बाबा यांच्या २० डिसेंबर, २०२२ रोजी पुण्यतिथी निमित्त दशसुत्री वर आधारीत कार्यक्रमाचे प्रभावी व यशस्वी आयोजन करण्याबाबत..**
**संदर्भ :** संत गाडगे बाबा अध्यासन केंद्र यांचे पत्र क्र.संगाबाअवि/३७१/२०२२ दिनांक ०९.१२.२०२२

**महोदय/महोदया,**

उपरोक्त संदर्भाकित विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, संत गाडगे बाबा अध्यासन केंद्र, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचे प्राप्त पत्रानुसार दिनांक २० डिसेंबर, २०२२ रोजी संत गाडगे बाबा यांच्या पुण्यतिथी निमित्त दशसुत्री वर आधारीत कार्यक्रमाचे आयोजन आपल्या महाविद्यालयामध्ये करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

त्यानुषंगाने सहपत्राप्रमाणे कार्यक्रमाचे आयोजन करुन कार्यक्रमाचा अहवाल १५ दिवसाचे आत डॉ.दिलीप काळे (अध्यासन प्रमुख) संत गाडगे बाबा अध्यासन केंद्र, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांच्या कार्यालयात पाठविण्याबाबत कृपया संबंधितांना सूचित करावे, ही विनंती.

आपल्या सुलभ माहितीकरीता सहपत्रानुसार परिपत्रक जोडण्यात येत आहे. सोबतचे परिपत्रक अवलोकावे व त्याअनुषंगाने आपण आपले स्तरावर कार्यवाही करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

**(डॉ.राजीव बोरकर)**
संचालक,
विद्यार्थी विकास,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**सहपत्र :** संत गाडगे बाबा अध्यासन केंद्र यांचे पत्र क्र.संगाबाअवि/३७१/२०२२ दिनांक ०९.१२.२०२२

**प्रतिलिपी :**
१. मा.कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.
२. प्र.कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.
३. कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**संत गाडगे बाबा अध्यासन केंद्र**

क्र. संगाबा अवि/371/२०२२
दि.९ /१२/२०२२

प्रति,

**प्राचार्य,**
**रासेयो व गैर रासेयोपथक**
**संलग्नीत सर्व महाविद्यालय**
**संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ**

**विषय :-** संत गाडगेबाबा यांच्या २० डिसेंबर २०२२ रोजी पुण्यतिथी निमित्य दशसुत्री. वर आधारीत कार्यक्रमाचे प्रभावी व यशस्वी आयोजन करण्याबाबत.

मा.महोदय,

मा. कुलगुरु तथा अध्यक्ष सल्लागार समिती सदस्य, संत गाडगेबाबा अध्यासन केंद्र यांच्या मौलिक निर्देशांन्वये वैराग्यमुर्ती संत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथी निमित्य खालील नमुद उपक्रम रासेयो व गैर रासेयो विद्यार्थी श्रम शक्ती व्दारा, प्रभावी व यशस्वी नियोजन व आयोजन करावयाचे आहे. उपक्रमाचे आयोजन वैराग्यमुर्ती संत गाडगेबाबा यांच्या दशसुत्रीवर आधारीत असावे. संत गाडगेबाबांचे विचार व कार्य समाजापर्यंत महाविद्यालयीन विद्यार्थी व शिक्षक वृंद यांच्या माध्यमातुन सकारात्मक व सामाजिक दृष्टीकोणातुन प्रस्तावित होऊ शकतो असा विश्वास मा. कुलगुरुंनी व्यक्त केलेला आहे.

उपरोक्त संदर्भाने खालील उपक्रम २०/१२/२०२२ संत गाडगेबाबांच्या पुण्यतिथीच्या औचित्य साधून राबवायचे आहे.

१. संत गाडगेबाबांच्या दशसुत्रीवर आधारीत वकृत्य स्पर्धा, चर्चासत्र, उद्‌बोधन
२. विद्यार्थ्यांचा सामाजिक, विकासात्मक, प्रकल्पांना, संस्थांना शिक्षकवृंदा सोबत भेटी.
३. अन्नपुर्णा योजने अंतर्गत सामाजिक जाणीवेतून सहभोजनास सहलीचे आयोजन (समाजातील अनाथ दुर्लक्षीत व उपेक्षितांनसोबत सहभोजनाचा लाभ घ्यावा.)
४. स्वच्छतेच्या दृष्टीने **''स्वच्छ भारत व स्वस्थ भारत अभियान''** अंतर्गत शासकीय सहकारी व ग्रामीण रुग्णालय, शिवार गावपरिसार इत्यादी ठिकाणी स्वच्छता अभियान राबविणे.

उपरोक्त नमुद कार्यक्रमाचे अनुषंगाने राबविलेल्या कार्यक्रमाची माहिती निबंधात्मक स्वरुपात व वृत्तपत्रीय कात्रन संक्षिप्त स्वरुपात अभिनव प्रकल्पाचे चित्रफीत (सी.डी)इत्यादी कार्यक्रमाचे आयोजना नंतर १५ दिवसाचे आत डॉ. दिलीप काळे (अध्यासन प्रमुख) संत गाडगेबाबा अध्यासन केंद्र संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ यांच्या कार्यालयात पाठविण्या संदर्भात कृपया संबंधितांना सुचित करावे ही विनंती.

विद्यापीठात गाडगेबाबंच्या कार्याचा अभिनव अहवाल तयार करावयाचा असल्यामुळे आपल्या मार्फत आयोजित अभिनव कार्याची माहिती सदर अहवालात प्रकाशीत करणे शक्य होईल. याची कृपया नोंद घ्यावी ही विनंती.

९/१२/२२

**डॉ. डी.एच.काळे**
**अध्यासन प्रमुख**
**संत गाडगेबाबा अध्यासन केंद्र**

**डॉ.राजेश बुरंगे**
**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**
**संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ**

**डॉ. तुषार देशमुख**
**कुलसचिव**
**संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ**